
केंद्राच्या यादीवरचे व राज्यशासनाच्या यादीवरचे संपूर्ण महाराष्ट्रात वितरित होणारे दैनिक



दैनिक राजस्व

RNI. NO. MAHMAR 2011/39185



सोलापूर | वर्ष १५ वे | ११४ | मराठी सायंदैनिक | गुरुवार १० सप्टेंबर २०२६

# ज्योती मेटेंचा मनोज जरांगेंना सल्ला, म्हणाल्या, ज्या मातेच्या कुशीतून जन्मलो, त्या संस्काराचे वर्तन ठेवा



बीड : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज १२ वा दिवस असून सरकारने आपल्या मागण्या मान्य न केल्यामुळे आपले उपोषण सुरूच राहणार असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले. एकीकडे सरकारकडून जरांगे पाटलांनी आपलं उपोषण मागे घ्यावे, असे आवाहन सातत्याने केलं जात आहे. मात्र, जोपर्यंत सर्वच मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याची भूमिका पाटलांनी घेतली आहे. तर, १२ तारखेला मुंबईला जाणारच या मागणीवर ठाम असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेवर शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या तथा दिवंगत विनायक मेटे यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे (ग्रींळ ाशींश) यांनी पत्रकार परिषद घेत स्पष्ट मत व्यक्त केले.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील १५ मागण्यांच्या बाबत तपशिलाने विचार केला तर यातील बारा मागण्या पूर्ण झाल्याचे मला दिसते. त्याबरोबरच शासनाने चर्चेची सर्व दारे खुली ठेवलेली आहेत. आपण जेव्हा आंदोलनाचे नेतृत्व करतो तेव्हा त्या आंदोलनाची यशस्वी अथवा अयशस्वी, जी काही असेल ती सांगता होणे गरजेचे असते. जरांगे पाटील यांनी प्रत्येक मागणीचा तपशिलाने विचार करावा आणि मगच काय तो निर्णय घ्यावा, असे ज्योती मेटे यांनी म्हटले आहे. युद्धात कमावलं आणि तहात गमावलं असं व्हायला नको, असेही त्यांनी स्पष्टपणे म्हटले.

जरांगे पाटील यांच्या शिवराळ भाषेबाबतही ज्योती मेटे यांनी वक्तव्य केले, गावगाडा चालला पाहिजे, जातीय सलोखा कायम राहिला पाहिजे या मताची मी आहे. आम्ही जेव्हा नेतृत्व करतो तेव्हा आमच्यावर जबाबदारी असते. आमचं वर्तन जसे असेल तसंच अनुयायांचे देखील असते. ज्या मातेच्या कुशीतून आपण जन्म घेतो तिचे संस्कार सार्थ ठरतील असेच वर्तन आपलं असलं पाहिजे, असे मेटेंनी म्हटले.

# माधुरी हत्तीणीला वनतारामध्येच ठेवा ; 'पेटा'कडून नांदणी मठामध्ये आणण्याच्या हालचाली सुरू होताच राज्य सरकारला पत्र

माधुरी हत्तीणीच्या घरवापसीची चर्चा रंगली असताना 'पेटा'कडून पुन्हा एकदा राज्य सरकारला पत्र लिहिण्यात आलं आहे. 'पेटा'कडून माधुरी हत्तीणीला वनतारामध्येच ठेवण्यात यावं असं पत्र लिहिण्यात आलं आहे. गेल्या काही महिन्यांपासून हत्तीणीच्या नांदणी मठामधील घर वापसीची चर्चा रंगली आहे. दुसरीकडे यासंदर्भात उच्चस्तरीय समितीसमोरसुद्धा या प्रकरणी सुनावणी पूर्ण झाली आहे. ही सुनावणी पूर्ण झाली असतानाच आता वनतारामध्येच हत्तीणीला ठेवण्यासाठी 'पेटा'कडून पत्र लिहिण्यात आलं आहे. दुसरीकडे हत्तीणीच्या घर वापसीसाठी गेल्या अनेक महिन्यांपासून लढा देणारे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी यासंदर्भात पोस्ट करत



पैशाने तुम्ही साम्राज्य विकत घेऊ शकता, पण जनतेच्या काळजातील प्रेम कधीच नाही, लवकरच आपली माधुरी पुन्हा नांदणी मठात दिसेल आणि तिचा आवाज आपल्या मातीत गुंजेल, असे म्हटले आहे.

राजू शेट्टी यांनी काय म्हटलं आहे? राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे की, पैशाने विकली गेली नव्हती ती निष्ठा आणि ती नाती, अखेर काळजाचा तुकडा परत घेऊनच शांत झाली ही शाहूराजांची माती. त्या काळरात्री जेव्हा तिला आपल्यापासून हिरावून नेलं गेलं, तेव्हा फक्त नांदणी मठ नाही, तर अख्खं कोल्हापूर ढसाढसा रडलं होतं, काळजावर जणू दगडच ठेवला गेला होता. एका गर्भश्रीमंत उद्योगपतीच्या बालहट्टासाठी आमची ४५० वर्षांची संस्कृती, परंपरा आणि वारसापायदळी तुडवला गेला.

# गोकुळ निवडणुकीसाठी पात्र १४०० दूध संस्थांचा अदृश्य शक्तीविरोधात एल्गार

कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ मतदान न करण्याचा निर्णय या दूध




अर्थात गोकुळची निवडणूक जाहीर झालीय. मात्र या निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त दूध संस्था अपात्र व्हाव्या यासाठी एका अदृश्य शक्तीचा हात असल्याचा आरोप दूध संस्थानी केला आहे. गेल्या ६ महिन्यात १४०० दूध संस्थांनी न्यायालयीन प्रक्रिया पार केल्यानंतर आता त्या पात्र झाल्यात. या निवडणुकीत १४०० दूध संस्थांना मतदानाचा हक्क मिळाला. याच पार्श्वभूमीवर या पात्र दूध संस्थांनी 'सत्यविजय कृतज्ञता मेळावा' घेत त्यांनी अदृश्य शक्तीच्या विरोधात एल्गार पुकारला. यंदाच्या निवडणुकीमध्ये अदृश्य शक्तीला संस्थांनी मेळाव्यात एकमुखाने केला आहे. अदृश्य शक्तीच्या विरोधात एल्गार

अब्दुललाटमधील विद्याधर अनंतराव कुलकर्णी म्हणाले की, ज्यांनी अडचणीच्या काळात आर्थिक आणि मानसिक पाठबळ दिले, त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा मेळावा आयोजित केला आहे. चेअरमन नाविद मुश्रीफ साहेब, हसन मुश्रीफ साहेब आणि नेते यड्रावकर साहेब यांनी वकिलांची फौज उभी करून मदत व पाठबळ दिले, म्हणून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आमचे कर्तव्य आहे.

# भाजप प्रवक्त्यांविरोधातील पोस्ट सीजेपी नेते हटवणार

भाजपचे प्रवक्ते गौरव भाटिया यांच्या मानहानीच्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास आणि आशुतोष रांका यांनी भाटिया यांच्या विरोधात एआयने तयार केलेल्या वादग्रस्त पोस्ट हटवण्यास सहमती दर्शवली आहे. दोन्ही पोस्ट २४ तासांच्या आत हटवण्यात येतील. या प्रकरणात न्यायालयाने सौरभ दास, आशुतोष रांका आणि सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांना समन्स बजावले. तसेच, भविष्यात अशा पोस्ट पुन्हा पोस्ट केल्यास आणि भाटिया यांनी तक्रार दाखल केल्यास, त्या हटवण्यासाठी कारवाई करण्याचे निर्देशही मेटा आणि एक्स यांना दिले.

वाद नेमका काय होता? हे प्रकरण सीजेपी कार्यकर्ते निशू आझाद यांचे वडील संजय कुमार यांच्यावरील हल्ल्याशी संबंधित आहे. सीजेपीचा आरोप आहे की, जंतर मंतर येथील आंदोलनादरम्यान स्वतंत्र भारद्वाज आणि इतरांनी संजय कुमार यांच्यावर हल्ला केला. या प्रकरणात सीजेपीने एफआयआर दाखल करून स्वतंत्र भारद्वाज यांच्यावर कारवाईची मागणी केली होती. यादरम्यान, सौरभ



दास यांनी एक ग्राफिक शेअर केले. त्यामध्ये गौरव भाटिया यांचा फोटो आणि नाव, तसेच स्वतंत्र भारद्वाज यांना 'दिमागी नक्षल' संबोधणारा एक संदेश होता. भाटिया यांनी असे कोणतेही विधान केल्याचे नाकारले आणि ती पोस्ट बनावट असल्याचे म्हटले. नंतर दास यांनी ती पोस्ट डिलीट केली आणि दावा केला की ते ग्राफिक एआय (ख) वापरून तयार केले होते. आशुतोष रांका यांच्यावर दास यांची पोस्ट पुन्हा शेअर केल्याचा आरोप आहे. दिल्ली पोलिसांनी ५ सप्टेंबर रोजी स्वतंत्र भारद्वाजला उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथून अटक केली होती.

# तुकाराम मुंढे MPSC चे अध्यक्ष होऊ शकतात, मी चेक केलंय

## रोहित पवारांकडून भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी

पुणे : एमपीएससी पेपर फुटीच्या मुद्द्यावरुन आमदार रोहित पवार यांनी एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. चङ्झड्ड पेपरफुटी प्रकरणात माझ्याविरुद्ध पुरावे दाखवा, मी पायउतार होईल असे भीमनवार यांनी म्हटले होते. त्यानंतर, रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन आज महापरिवहन विभागात त्यांच्या त्यांच्या कार्यकाळात झालेल्या तक्रारी, घोटाळ्याची आणि गैरव्यवहाराची माहिती दिली. तसेच, मुख्यमंत्र्यांनी त्यांचा राजीनामा घ्यावा आणि अन्यथा ते मुख्यमंत्र्यांचे मित्र आहेत, म्हणूनच त्यांचा राजीनामा होत नाही, असा संदेश समाजात जाईल, असेही रोहित पवार यांनी म्हटले. दरम्यान, रोहित पवार यांनी चङ्झड्ड च्या अध्यक्षपदी तुकाराम मुंढेंची नियुक्ती करावी, अशीही मागणी केली आहे.

भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी आज पुण्यातील एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली. त्यावरुन, भाजपकडून कोणीतरी आलं होतं तुमच्याशी बोलायला,




त्यांची फजिती झाली, असे म्हणत रोहित पवार यांची विक्रम पाचपुतेंवर टीका केली. तसेच, चाणक्यांचा फोटो दाखवत अमित शहा यांच्यावर देखील रोहित पवार यांच्याकडून टीका करण्यात आली., बरेच लोक चाणक्य असल्याचं सांगतात, त्यांचं तरी ऐका असं म्हणत टोला लगावला. आम्ही लढत राहणार आहोत तुम्ही पाठिंबा द्या, तुमच्यासाठी शेवटपर्यंत लढू, कारण हा विषय महत्वाचा आहे.

राजस्व



# महाराष्ट्र सदनात गणेशोत्सवानिमित्त भव्य सांस्कृतिक सोहळा

नवी दिल्ली, दि. १० : राजधानी दिल्लीतील कोपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनात यंदाचा गणेशोत्सव भक्तिमय वातावरणासोबतच महाराष्ट्राच्या समृद्ध कला, संस्कृती, खाद्यपरंपरा आणि वस्त्रपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या विविध कार्यक्रमांनी रंगणार आहे. निवासी आयुक्त तथा सचिव डॉ. श्वेता सिंघल यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्या वतीने १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरांचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा, हा या उत्सवामागील प्रमुख उद्देश आहे.गणेशोत्सवाच्या कालावधीत दररोज सकाळी ९ वाजता आणि सायंकाळी ६.१५ वाजता श्रींची महाआरती होणार आहे. उत्सवाच्या पहिल्या दिवशी, १४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता श्रींची मिरवणूक, सकाळी ११ वाजता प्राणप्रतिष्ठा, तर सायंकाळी ७ वाजता जुन्या महाराष्ट्र सदनात भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

१५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० ते रात्री ९.३० या वेळेत संसद मार्गावरील आकाशवाणी रंगभवन येथे भरत जाधव व अन्य कलाकारांचा गाजलेला मराठी नाट्यप्रयोग 'पुन्हा सही रे सही' सादर होणार आहे. १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता जुन्या महाराष्ट्र सदनात 'नितीन सरकटे हंसराज' लाईव्ह कॉन्सर्ट आयोजित करण्यात आला आहे.

१७ सप्टेंबर रोजी आकाशवाणी रंगभवन येथे वैभव जोशी व संदीप खरे यांचा 'मराठी चित्रपट गीते' हा विशेष कार्यक्रम, तर १८ सप्टेंबर रोजी संतोष भांगरे प्रस्तुत 'महाराष्ट्राची लोककला' हा कार्यक्रम होणार आहे. १९ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते २ या


कार्यक्रम पत्रिका

वेळेत श्री सत्यनारायण पूजा व महाप्रसाद आयोजित करण्यात आला असून, सायंकाळी ६.३० वाजता जुन्या महाराष्ट्र सदनात गझल नवाज भीमराव पांचाळे यांचा मराठी गझल कार्यक्रम होईल. २० सप्टेंबर रोजी जनपथ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेंटर येथे वैशाली सामंत, ऋषिकेश रानडे, शरयू दाते व अन्य गायकांचा 'मराठी चित्रपट गीते' कार्यक्रम रंगणार आहे.

२१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता 'पाक कलाकृती' स्पर्धा, तर सायंकाळी ६.३० वाजता साध्वी जेठवानी सादरीकृत 'भरत नाट्यम' कार्यक्रम जुन्या महाराष्ट्र सदनात होणार आहे. २२ सप्टेंबर रोजी राजेंद्र क्षीरसागर सादरकर्ते असलेला 'खेळ पैठणीचा' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

२३ सप्टेंबर रोजी आकाशवाणी रंगभवन येथे प्रमिला लोदगेकर प्रस्तुत 'लावणी' कार्यक्रम, तर २४ सप्टेंबर रोजी जुन्या महाराष्ट्र सदनात मोनिका कपूर प्रस्तुत 'बॉली बीट्स' या हिंदी-मराठी गायन व नृत्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# मराठवाड्यात बैलपोळादिनी दुष्काळाचं भयाण वास्तव; कुठं वॉशिंग सेंटरवर, तर कुठं पाणी शिंपडून बैल धुतले

पोळ्याच्या दिवशी बैल धुवायला पाणी नसल्याने नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी चक्क आपल्या लाडक्या बैल



तळ्याकाठी नेत बैलांवर पाणी शिंपडायची वेळ बळीराजावर आल्याचं भीषण चित्र आज महाराष्ट्राल पाहायला मिळालं. गेल्या महिनाभरापासून म राठवाड्यात पावसाने दडी मारल्याने दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा बैलपोळा सणावरही परिणाम झाल्याचं दिसून आलं.

२/८तलावात पाणी असताना पोळ्याच्या आधी बैलांना पोहणीसाठी सोडण्यात येते, त्यांना स्वच्छ धुण्यात येते. त्यांना आकर्षक रंग लावण्यात येतो. मात्र, यंदा दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्याने तलावांनी तळ गाठला आहे.

तलावात पाणी असताना पोळ्याच्या आधी बैलांना पोहणीसाठी सोडण्यात येते, त्यांना स्वच्छ धुण्यात येते. त्यांना आकर्षक रंग लावण्यात येतो. मात्र, यंदा दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्याने तलावांनी तळ गाठला आहे.

३/८तलावात बैलांना धुण्यासाठी देखील पाणी उपलब्ध जोडीवर पाणी शिंपडावे लागले.

तलावात बैलांना धुण्यासाठी देखील पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी चक्क आपल्या लाडक्या बैल जोडीवर पाणी शिंपडावे लागले.

४/८बीडमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा आणखी एक विदारक चेहरा समोर आला आहे. आज बैलपोळा सणासाठी वर्षभर आपल्या शेतात राबणाऱ्या बैल जोडीला धुण्यासाठी देखील तळ्यात पाणी नसल्याचे दिसून आले. त्यामुळे बळीराजाने बैल जोडीला तलावाकाठी नेत तळ्यातील उरले सुरले पाणी बैलांवर शिंपडण्याची वेळ आलीय.

८/८बीड ग्रामीण परिसरात सध्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने पिकांवर संकट आले आहे. त्यामुळे मायबाप सरकारने दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

# सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे १२ सप्टेंबर २०२६ रोजी तिसऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीचे' आयोजन

सोलापूर दि.०९ (जिमाका):- मा. म हाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार सन २०२६ सालातील तिसरे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन शनिवार, दिनांक १२ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. ही लोकअदालत सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांच्या आवारात एकाच वेळी पार पडणार आहे. या लोकअदालतमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, कलम १३८ एन. आय. ॲक्ट ची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भूसंपादन बाबतची प्रकरणे, तसेच बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त, बँक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पद्धतीने उपस्थित राहणेकरीता ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जाणार आहे. धनादेश न वटलेल्या फौजदारी प्रलंबित प्रकरणांमध्ये धनादेशाची थोडी रक्कम भरून प्रकरण निकाली काढता येणे शक्य होणार आहे. धनादेशाची रक्कम एक रकमी देता येणे शक्य नसल्यास ठरलेल्या रक्कमेचे हप्ते बांधून घेणे शक्य होणार आहे. काही रक्कम लोकअदालती दिवशी देऊन उर्वरीत रक्कमेबाबत तडजोड हुकूमनामा करणे व संपूर्ण फौजदारी प्रकरण निकाली निघणे शक्य होणार आहे. परिणामस्वरूप पक्षकारास न्यायालयात पुन्हा हजर राहण्याची आवश्यकता राहणार नाही. आपले प्रलंबित वाद कायमचे मिटवण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त पक्षकार, संस्था आणि नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मा. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज एस. शर्मा आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोलकुमार ए. देशपांडे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# टीम इंडिया आशियाई क्रीडा स्पर्धेत निळ्या जर्सीत दिसणार!

जपानमध्ये होणाऱ्या आगामी आशियाई खेळांसाठी भारतीय हॉकी संघ पुन्हा एकदा निळ्या रंगाची जर्सी परिधान करणार आहे. नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये झालेल्या हॉकी विश्वचषक स्पर्धेदरम्यान, भारतीय पुरुष आणि महिला संघांचे मुख्य किट बदलून केशरी रंगाचे करण्यात आले होते. जर्सीमधील या बदलामुळे मोठा वाद निर्माण झाला होता आणि अनेक माजी हॉकी खेळाडूंनी हा बदल अन्यायकारक असल्याचे सांगत त्यावर टीका केली होती. या पार्श्वभूमीवर, हॉकी इंडियाने आता आशियाई खेळांसाठी आपला निर्णय मागे घेतला आहे. २७ जुलै रोजी, हॉकी इंडियाने जर्सी बदलण्याचे कारण निळे मैदान असल्याचे सांगितले होते. निळ्या जर्सीमुळे भारतीय खेळाडूंना त्यांचे सहकारी खेळाडू पाहण्यात अडचण येत असल्याचे म्हटले होते. मात्र, माजी



कर्णधार धनराज पिल्ले, विरेन रासकिन्हा, परगत सिंग, अजित पाल सिंग आणि वासुदेवन बास्करन यांनी या बदलावर तीव्र टीका केली होती.

हॉकी इंडियाच्या अधिकाऱ्यांमध्येही मतभेद

या वादामुळे हॉकी इंडियामध्येही तणाव निर्माण झाला होता. अध्यक्ष दिलीप तिर्की यांनी सांगितले की, हा निर्णय त्यांच्या माहितीशिवाय घेण्यात आला होता, तर सचिव भोला नाथ सिंह यांनी दावा केला की सर्व अधिकाऱ्यांना याची माहिती होती.

# जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या पदांसंदर्भात महत्वाची अपडेट समोर उपायुक्त दीपक खरात यांच्याकडील कार्यभार समाप्त

छत्रपती संभाजीनगर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या पदांसंदर्भात राज्य शासनाने अत्यंत महत्त्वाचा प्रशासकीय निर्णय घेतला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने काढलेल्या नवीन आदेशानुसार, या समितीच्या 'उपायुक्त तथा सदस्य' या पदाचा अतिरिक्त कार्यभार आता बदलण्यात आला आहे. ९ सप्टेंबर २०२६ रोजी मंत्रालयातून याबाबतचे अधिकृत आदेश जारी करण्यात आले आहेत.

यापूर्वी ३० सप्टेंबर २०२५ च्या आदेशान्वये समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त दीपक खरात यांच्याकडे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त तथा सदस्यपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला होता. मात्र, नवीन आदेशानुसार प्रशासकीय कारणास्तव खरात यांच्याकडील हा अतिरिक्त कार्यभार तातडीने समाप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे यापूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी जात पडताळणी समितीच्या अधिकाऱ्यांवर टीका केली होती.

पुन्हा एकदा जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणीचा मुद्दा ऐरणीवर

जात प्रमाणपत्र दिल्यानंतर पुन्हा जात पडताळणी कशासाठी? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केला होता. महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसणारे मनोज जरांगे पाटील यांनी सरकारसमोर एक मोठी मागणी ठेवली होती. राज्यातील जात पडताळणी समित्याच बरखास्त करा आणि जात पडताळणीच्या प्रक्रियेत आवश्यक ते बदल करा असी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली होती. यानंतर आता समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त दीपक खरात यांच्याकडील जिल्हा




जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त तथा सदस्यपदाचा अतिरिक्त कार्यभार संपवण्यात आला आहे. मनोज जरांगे पाटील हे गेल्या १२ दिवसापासून उपोषण करत आहेत

दरम्यान, मनोज जरांगे पाटील हे गेल्या १२ दिवसापासून उपोषण करत आहेत, कोणत्याही परिस्थितीत मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोशण मागे घेणार नसल्याची भूमिका जरांगे पाटील यांनी घेतली आहे. आज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा १२ वा दिवस आहे. दिवसेंदिवस जरांगे पाटील यांची प्रकृती खालावत झालल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मात्र, तरीही मनोज जरांगेपाटील हे उपोषणावर ठाम आहेत. दरम्यान, ९ सप्टेंबर २०२६ रोजी मंत्रालयातून याबाबतचे अधिकृत आदेश जारी करण्यात आले आल्याची माहिती देखील मिळाली आहे.

This daily evening news paper ,owner,publisher ,printer, Editor,Prasad Sanjay Pawar, printed at RAJASWA printing press , 53/A Budhawar Peth ,Laxman Maharaj Nagar ,SOLAPUR and published here It is not possible that editors of this article will agree ( solapur jurisdiction) Mo-7387386385

सायंदैनिक राजस्व


# विमानसेवेच्या प्रश्नावर सोलापूर विकास मंचाची जिल्हाधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा!

प्रतिनिधी : सोलापूर

दिनांक : ०७/०९/२०२६ : सोलापूरची विमानसेवा वारंवार बंद होणे, विमानफेऱ्या रद्द होणे आणि प्रस्तावित नवीन विमानसेवा प्रत्यक्षात सुरू न होणे, या गंभीर प्रश्नावर सोलापूर विकास मंचाच्या शिष्टमंडळाने आज जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी विमानसेवेबाबत निर्माण झालेली अनिश्चितता, सोलापूरकरांमध्ये वाढत असलेली नाराजी तसेच शहराच्या भविष्यातील औद्योगिक आणि आर्थिक विकासावर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत मंचाने जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. सोलापूर-मुंबई विमानसेवा पुन्हा अनिश्चित काळासाठी बंद होणे, ॠ९१ची सोलापूर-गोवा व सोलापूर-हैदराबाद सेवा नियमितपणे सुरू नसणे आणि सोलापूर-तिरुपती विमानसेवा अद्याप सुरू न होणे, या सर्व बाबींची माहिती शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडली. व्हॉट्सॲप पोलमधून सोलापूरकरांचा संताप समोर विमानसेवेबाबत सोलापूरकरांच्या भावना जाणून घेण्यासाठी सोलापूर विकास मंचाने व्हॉट्सॲप पोल आयोजित केला होता. या पोलला मिळालेल्या प्रतिसादातून विमानसेवेतील अनिश्चितता आणि प्रशासनाच्या या विषयाकडे पाहण्याच्या पद्धतीबाबत नागरिकांमध्ये मोठी नाराजी असल्याचे मंचाने जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. विमानसेवा ही निवडणुकीपुरती आश्वासने देण्याची बाब नसून सोलापूरच्या विकासाची मूलभूत गरज आहे, अशी भूमिका मंचाने मांडली. विमानसेवा नसेल तर गुंतवणूक आणि आय.टी. पार्कचे काय? सोलापूरमध्ये नवीन उद्योग, आय.टी. पार्क आणि मोठ्या गुंतवणुकीच्या चर्चा होत असताना शहराची हवाई कनेक्टिव्हिटी मात्र अनिश्चित राहणे हा गंभीर विरोधाभास असल्याचे मंचाने स्पष्ट केले. मुंबई, हैदराबाद, गोवा, पुणे आणि देशातील इतर महत्त्वाच्या शहरांशी नियमित विमानसेवा उपलब्ध नसल्यास बाहेरील गुंतवणूकदार, आय.टी. कंपन्या आणि व्यावसायिक सोलापूरला प्राधान्य देतील का, असा सवाल मंचाने उपस्थित केला. विश्वासार्ह विमानसेवेअभावी नवीन गुंतवणूक सोलापूरमध्ये आणणे कठीण होईल आणि त्याचा थेट परिणाम आय.टी. पार्कच्या भवितव्यावर तसेच रोजगारनिर्मितीवर होऊ शकतो. त्यामुळे विमानसेवेचा प्रश्न हा केवळ प्रवाशांच्या गैरसोयीचा नसून सोलापूरच्या भविष्यातील विकासाचा प्रश्न आहे, असे मंचाने स्पष्ट केले. होटगी रोड विमानतळ आणि बोरामणीबाबतही चर्चा विद्यमान होटगी रोड विमानतळावर नाईट लँडिंगसह आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून विमानसेवा नियमित करण्याची गरज असल्याचे मंचाने सांगितले. तसेच बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रस्तावाबाबतही पारदर्शक माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. होटगी रोड विमानतळाचा विकास आणि बोरामणी विमानतळ या दोन्ही पर्यायांचा तांत्रिक, आर्थिक आणि भविष्यातील प्रवासी मागणीच्या आधारे तुलनात्मक अभ्यास करून त्याची माहिती सोलापूरकरांसमोर ठेवावी, अशी भूमिका मंचाने मांडली. पालकमंत्र्यांच्या पुढील दौऱ्यात सविस्तर बैठक जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्यासोबत झालेली आजची चर्चा सकारात्मक आणि आश्वासक झाली, अशी माहिती सोलापूर विकास मंचाच्या शिष्टमंडळाने दिली. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या पुढील सोलापूर दौऱ्यादरम्यान सोलापूर विकास मंचासोबत विमानसेवेच्या प्रश्नावर सविस्तर बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीत सोलापूरच्या विमानसेवेची सद्यस्थिती, भविष्यातील विमानसेवा, नाईट लँडिंग, होटगी रोड विमानतळाचा विकास, बोरामणी विमानतळ तसेच सोलापूरच्या औद्योगिक व आय.टी. विकासाशी संबंधित हवाई कनेक्टिव्हिटी या सर्व विषयांवर सविस्तर चर्चा होण्याची अपेक्षा आहे.



आजची चर्चा सकारात्मक असली तरी सोलापूर विकास मंच आता केवळ आश्वासनांवर समाधान मानणार नसून प्रत्यक्ष निर्णय आणि कालबद्ध कृतीकडे लक्ष ठेवणार आहे. ह्यावेळी सोलापूर विकास मंचचे सदस्य केतन शहा, मिलिंद भोसले, योगीन गुर्जर, विजय कुंदन जाधव, मनोज क्षीरसागर, प्रा. प्रसन्न नाझरे, सुहास भोसले, गणेश पेनगोंडा आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते. सोलापूरला घोषणांचे नव्हे, तर नियमित आणि विश्वासार्ह विमानसेवेचे पंख हवेत. विमानसेवा मजबूत झाली तरच उद्योग, गुंतवणूक, आय.टी. पार्क आणि रोजगाराला गती मिळेल. प्रशासनासोबत सकारात्मक संवाद ठेवून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सोलापूर विकास मंच सातत्याने पाठपुरावा करणार आहे, अशी भूमिका मंचाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ठाणे, दि.१० : गणेशमूर्तीच्या भव्यतेपेक्षा भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाला अधिक महत्व असून, गणेशोत्सवासारखा सांस्कृतिक वारसा जपणारा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे, ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. वाशी येथील सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित ‘पर्यावरणपूरक महा गणेश मूर्ती कार्यशाळा २०२६’ मध्ये ते बोलत होते. या भव्य कार्यशाळेत एकाच वेळी तब्बल १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची निर्मिती करून ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये महाराष्ट्राच्या नावावर नवा जागतिक विक्रम नोंदवला. या ऐतिहासिक सोहळ्याला पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, वनमंत्री गणेश नाईक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार मंदा म्हात्रे, आमदार रवींद्र फाटक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि कला संचालनालयाचे संचालक डॉ. नितीन इंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की,



गणराया ही बुद्धीची देवता असून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाला अनन्यसाधारण महत्व आहे. सृष्टीची निर्मिती करणाऱ्या पंचमहाभूतांचे रक्षण झाले तरच मानवी जीवन सुरक्षित राहू शकते. मोठ्या गणेशमूर्ती, प्लास्टर ऑफ पॅरिस आणि कृत्रिम रंगांमुळे जलस्रोतांचे होणारे नुकसान टाळण्याचे आवाहन करताना ते म्हणाले की, मूर्ती लहान असो वा मोठी, भक्ती सारखीच असते. ईश्वराचा आशीर्वाद हा मूर्तीच्या आकारावर नव्हे, तर आपण पर्यावरण आणि समाजाची किती निस्वार्थ सेवा करतो यावर ठरतो.

# राष्ट्रीय पोषण माह २०२६ चा शुभारंभ ११ सप्टेंबर रोजी

मुंबई, दि. १० : महिला व बालविकास विभागाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या अंतर्गत




राष्ट्रीय पोषण माह २०२६ चा शुभारंभ कार्यक्रम महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या मुख्य उपस्थितीत ११ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता यशवंतराव चव्हाण मुख्य सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

या शुभारंभ कार्यक्रमास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त वर्षा लड्डा, एकात्मिक बालविकास सेवा आयुक्त माधवी सरदेशमुख उपस्थित राहणार आहेत.

९ वा राष्ट्रीय पोषण माह २०२६, ‘माझी अंगणवाडी माझी जबाबदारी’ या संकल्पनेवर आधारित आहे. पोषण अभियानांतर्गत दरवर्षी सप्टेंबर महिन्यात राष्ट्रीय पोषण माह साजरा करण्यात येतो. गर्भवती महिला, स्तनदा माता, बालके, किशोरवयीन मुले-मुली आणि त्यांच्या कुटुंबांमध्ये पोषण, आरोग्य व संगोपनासंदर्भात व्यापक सहभागातून सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने हा पोषण माह साजरा केला जातो.

यंदाचा पोषण माह हा पुरेशा प्रथिनांचे सेवन, विविध पुरेशा प्रथिनांचे सेवन, विविध अन्नगटांचा समावेश आणि स्थानिक अन्नपदार्थांवर भर देऊन आहारातील विविधतेस प्रोत्साहन देणे. नव्याने गठित अंगणवाडी व्यवस्थापन समित्या आणि एसएनपी मेनू बोर्ड यांच्या माध्यमातून पोषणासाठी समुदायाची मालकी व उत्तरदायित्व बळकट करणे. प्रारंभिक बाल संगोपन व शिक्षणामध्ये ईसीसीई संज्ञानात्मक विकास आणि पुरेसे पोषण हे मूलभूत घटक म्हणून प्रोत्साहित करणे तसेच बालक काय खाते आणि कसे शिकते यामधील अविभाज्य संबंध अधोरेखित करणे. याचबरोबर प्रधानमंत्री मातृ वंदना योजना या भारतातील प्रमुख मातृत्व लाभ योजने.

# कायदेविषयक जनजागृती व आरोग्य शिबीर कार्यक्रम सोलापूर जिल्हा कारागृहात कायदेविषयक जनजागृती व आरोग्य शिबीर उत्साहात संपन्न

सोलापूर दि.१० (जिमाका):- मा. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व्दारा निर्धारीत, आणि मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधीकरण, मुंबई यांच्या निर्देशान्वये आणि सार्वजनिक न्यास नोंदणी तथा धर्मादाय कार्यालय, सोलापूर यांच्या सौजन्याने जिल्हा विधी सेवा प्राधीकरण, सोलापूर आणि सोलापूर जिल्हा कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने बंदयांसाठी आरोग्य तपासणी शिबीर व कायदेविषयक जनजागृती शिबीर आयोजीत करण्यात आले होते.

या कार्यकमाचे उदघाटन मा. न्या. धर्मादाय उपआयुक्त ईश्वर सुर्यवंशी यांचे हस्ते झाले. धर्मादाय विभागाचा उद्देशच सामाजीक न्याय आहे. कारागृहातील बंदयांच्या सुधारणेसाठी आरोग्य आणि कायदयाचे ज्ञान दोन्ही आवश्यक आहे. हा उपक्रम सर्वांना न्यायाची समान उपलब्धता या संकल्पनेला बळ देणारा आहे, असे अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले.

जिल्हा विधी सेवा प्राधीकरणचे सचिव मा.न्या. अमोलकुमार देशपांडे यांनी बंद्याना गुन्हयाची कबुली देवून शिक्षेत सवलत मिळविण्याची प्रक्रिया याविषयी विस्तृत स्वरूपात माहिती देवून ही कायदयातील एक महत्त्वाची तरतूद आहे, असे सांगितले

जिल्हा विधी सेवा प्राधीकरणचे विधीज्ञ ॲड अंजली बावरे यांनी बंदयांना जामीनाचा अधिकार, जामीनाच्या तरतूदी याविषयी माहिती दिली आणि विधीज्ञ ॲड मुफक्कम जहागीरदार यांनी अटकेतील व्यक्तींचे अधिकार याविषयी माहिती दिली.

कारागृह अधीक्षक सुशिल कुंभार यांनी प्रस्तावना व मान्यवरांचे स्वागत करताना, बंदयांच्या आरोग्याची काळजी घेणे व बंदयांना कायदेशीर हक्क मिळवून देणे हे आमचे कर्तव्य असून अशा शिबीरांमुळे बंदी बांधवांमध्ये सकारात्मकता येत असल्याचे सांगितले,

सोलापूर जिल्हयातील नामांकित अश्वीनी हॉस्पीटल, कुंभारी येथील डॉ. अविनाश सुलताने, डॉ. मयुर हांगे, डॉ. धीरेंद्र लोहकरे, डॉ. ताहिरा मुजावर, डॉ. साधना साळवे, बिलाल नल्लामंदु आणि त्यांचे सहकारी यांनी बंदीजनांच्या आरोग्याची (कान, नाक, घसा, त्वचा, मधुमेह, रक्तदाब, ताप-सर्दी-खोकला इ.) तपासणी करून उपचार केले.

युगंधर मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, सोलापूर येथील होमिओपॅथीचे तज्ञ डॉ. ओवेस इनामदार, डॉ. विशाखा साळवे आणि पौरवी शिक्षण प्रसारक मंडळ, महिला होमिओपॅथी मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटल मध्ये शिक्षण घेतलेल्या १७ विदयार्थींनी बंदयांची आरोग्य तपासणी करून होमिओपॅथीची औषधी दिली. सदर कार्यकमाचे सुत्रसंचालन कारागृह शिक्षक अंगद गव्हाणे यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधीकरणचे लिपीक सुजय हसरमनी यांनी केले.

# धाराशिवमध्ये 'सकल धनगर समाजातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन

धाराशिव (प्रतिनिधी)

महाराष्ट्रातील धनगर जमातीच्या विविध प्रलंबित व न्याय मागण्यांकडे शासनाचे



लक्ष वेधून घेण्यासाठी आणि राज्यव्यापी आंदोलनाला प्रतिसाद देण्यासाठी आज संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात सकल धनगर समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये जाऊन नाय व हक्काच्या मागण्या करण्यात आल्या. याच पार्श्वभूमीवर धाराशिव येथेही मुख्यमंत्री महोदयांच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. सदर निवेदनामध्ये धनगर जमातीच्या न्याय व हक्काच्या मागण्या पुढील प्रमाणे आहेत निवेदनातील प्रमुख मागण्या आहेत. सर्वोच्च न्यायालयात चालू असलेली विशेष अनुमती याचिका महाराष्ट्र शासनाने पूर्ण ताकदीने व गांभीर्याने लढावी. दिनांक ८ सप्टेंबर २०२६ पूर्वी शासनाने धनगर आरक्षणाच्या समर्थनार्थ ठोस, सकारात्मक आणि सर्व कायदेशीर व घटनात्मक बाबी स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात दाखल करून अनुभवी व सक्षम वकिलांची नियुक्ती करावी. तसेच आरक्षणाबाबत कोणताही प्रतिकूल निर्णय आल्यास धनगरांना एसटीचे प्रमाणपत्र देण्यासाठी 'प्लॅन बी' तयार ठेवावा. श्री संत बाळूमामा देवस्थानासाठी विशेष शासकीय स्वतंत्र कायदा करण्यात यावा. या विश्वस्त मंडळामध्ये किमान २१ विश्वस्त असावेत आणि या देवस्थानचे अध्यक्ष हे धनगर समाजाचे असावे. मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील 'मिसिंग लिंक'ला स्वातंत्र्यवीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्यात यावे. मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकास लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे. धनगर समाजाच्या न्याय व हक्काच्या मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन संपूर्ण राज्यातील धनगर समाजाला न्याय मिळवून द्यावा. अशी आग्रहाची विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

हे निवेदन सकल धनगर जमात जिल्हा धाराशिव व अहिल्या सखी मंच तसेच विविध संघटनांच्या वतीने देण्यात आले.यावेळी प्रा. सोमनाथ लांडगे, गणेश शिवाजीराव सोनटक्के, लिंबराज डुकरे, सुभाष मैंदाड, नाना वाकडे, दादा वाघे, व विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच अखिल भारतीय आदिवासी धनगर साहित्य संमेलन महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्ष एड. जयश्री तेरकर, अहिल्या सखी मंच धाराशिवच्या अध्यक्षा डॉ. शैलजा पैकेकर, दैवशाला हाके,अर्चना मैंदाड, काकडे व इतर महिला तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने निवेदन देण्यासाठी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर येळकोट येळकोट जय मल्हार तसेच बाळूमामाच्या नावानं चांगभलं अशा घोषणाबाजीने संपूर्ण परिसर दुमदुमून गेलेला होता. हे निवेदन सकल धनगर जमात जिल्हा धाराशिवच्यावतीने राज्यव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

# निवासी आदर्श सैनिक स्कूल, कुर्डूवाडी येथे विविध पदांसाठी भरती

सोलापूर, दि. १० (जिमाका) : सोलापूर जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांना कळविण्यात येते की, आदर्श सैनिक स्कूल, कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर या निवासी शाळेसाठी अनुभवी व शिस्तप्रिय माजी सैनिकांची तातडीने आवश्यकता आहे.

सदर शाळेत खालील पदांसाठी भरती करण्यात येत आहे.

१) ड्रिल इन्स्ट्रक्टर - ०२ पदे पात्रता : माजी सैनिक / जेसीओ / एनसीओ / नायब सुभेदार / हवालदार उमेदवारांना प्राधान्य. ड्रिल, पीटी व विद्यार्थ्यांच्या शारीरिक प्रशिक्षणाचे ज्ञान आवश्यक.

२) पीटी इन्स्ट्रक्टर - ०२ पदे पात्रता : माजी सैनिक / जेसीओ / एनसीओ / नायब सुभेदार / हवालदार उमेदवारांना प्राधान्य. ड्रिल, पीटी व विद्यार्थ्यांच्या शारीरिक प्रशिक्षणाचे ज्ञान आवश्यक.

३) मेडिकल असिस्टंट / नर्सिंग असिस्टंट (माजी सैनिक) - ०१ पद पात्रता : आर्मी मेडिकल असिस्टंट / नर्सिंग असिस्टंट / एएमसीमधील अनुभव अपेक्षित.

४) मेडिकल सुपरवायझर / मेडिकल इन-चार्ज - ०१ पद पात्रता : फर्स्ट एड, प्राथमिक आरोग्य सेवा, वैद्यकीय नोंदी व आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याची क्षमता. सदर पदांसाठी माजी सैनिक, जेसीओ, एनसीओ, नायब सुभेदार, हवालदार तसेच आर्मी मेडिकल असिस्टंट, नर्सिंग असिस्टंट, एएमसीमधील उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. विद्यार्थ्यांना शारीरिक प्रशिक्षण, शिस्त, नेतृत्वगुण तसेच सैनिकी मूल्यांचे प्रशिक्षण देण्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांना विशेष प्राधान्य राहील. ही नोकरी निवासी स्वरूपाची असून निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी आपला सीव्ही / बायोडेटा व्हॉट्सपद्वारे मोबाईल क्रमांक ९५५२७७७७२५ वर पाठवावा. तरी सोलापूर जिल्ह्यातील पात्र व इच्छुक माजी सैनिकांनी सदर संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# पावसाचा खंड, पिकांवर पाण्याचा ताण; बार्शीत ११ महसूल मंडळांत संयुक्त पीक पाहणी!

बार्शी, दि. ९ सप्टेंबर २०२६ : ( राजश्री गवळी ) खरीप हंगाम २०२६ मध्ये बार्शी तालुक्यात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहिल्याने तसेच पावसाचा मोठ्या प्रमाणावर खंड पडल्यामुळे खरीप पिकांवर झालेल्या परिणामाची प्रशासनाकडून गांभीर्याने दखल घेण्यात आली आहे. राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीच्या निर्देशानुसार आणि सोलापूर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने बार्शी तालुक्यातील सर्व ११ महसूल मंडळांमध्ये शेतपिकांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येत आहे. या पाहणीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील प्रत्यक्ष परिस्थिती प्रशासनाच्या निदर्शनास येत असून, संभाव्य पीक नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती संकलित केली जात आहे. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार गठीत करण्यात आलेल्या संयुक्त पीक पाहणी समितीने आज बार्शी



तालुक्यातील विविध गावांमध्ये प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पिकांची पाहणी केली. पावसाच्या खंडामुळे पिकांवर निर्माण झालेला पाण्याचा ताण, पिकांची सद्यस्थिती, वाढीवर झालेला परिणाम तसेच संभाव्य नुकसान याबाबत प्रत्यक्ष निरीक्षण करून माहिती नोंदविण्यात आली. त्यामुळे केवळ कागदोपत्री अहवालावर अवलंबून न राहता शेतातील वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रशासनाचा प्रयत्न दिसून आला.

या संयुक्त पीक पाहणी समितीमध्ये उपविभागीय अधिकारी तथा तालुकास्तरीय दुष्काळ देखरेख समितीचे अध्यक्ष सदाशिव पडदुणे, तहसीलदार एफ. आर. शेख, तालुका कृषी अधिकारी एस. एस. कोयले, गटविकास अधिकारी विवेक जमदाडे, राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त प्रगतिशील शेतकरी उमाकांत शंकर भोंडटे व विनोद शिवाजी धुमाळ, तसेच कृषी विज्ञान केंद्र, सोलापूरचे शास्त्रज्ञ पी. ए. गोजारी यांचा समावेश आहे. प्रशासनिक अधिकारी, कृषी विभागातील अधिकारी आणि कृषी तज्ज्ञांच्या संयुक्त सहभागामुळे पाहणी अधिक व्यापक पद्धतीने करण्यात येत आहे.

# पांडुरंग गाडे यांचा तुळजापुरात सत्कार

तुळजापूर (दि ९).येथील जिल्हा परिषद शाळेचे सेवानिवृत्ती शिक्षक पांडुरंग गाडे यांचा निस्वार्थी सेवेबद्दल नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ तुळजापूर च्या वतीने मुख्याध्यापक गणेश रोचकरी ,सहशिक्षक महेंद्र कावरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी स.शि.महेंद्र पाटील, सुरजमल शेटे, सुज्ञानी गिराम, केरण लोहारे ,विद्यादेवी स्वामी उपस्थित होते.

पांडुरंग गाडी हे मे २०१४ रोजी सेवेतून शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झाले.



परंतु त्यांनी २०१४ पासून तुळजापूर तालुक्यातील विविध जिल्हा परिषद शाळा, नगरपरिषद शाळा, खाजगी शाळा येथे गणित विषयाचे नियमित मोफत शिक्षण देत आहेत.

हे विविध शाळेमध्ये इ.४ थी इ.५ वी व इ. ७ वीच्या शिष्यवृत्ती तसेच नवोदय विद्यालया साठी बसलेल्या विद्यार्थ्यांना विनामूल्य ,मोफत शाळेत जादा तास घेऊन मार्गदर्शन करतात.

गणित विषयात त्यांचा हातखंड असून सेवानिवृत्तीनंतर हे विना मोबदला त्यांनी अखंडितपण ज्ञानदान देण्याचे काम सुरू ठेवले आहे त्यांच्या या कार्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत असून. १२ वर्ष ते ज्ञान देण्याचे कार्य करीत आहेत. आपल्या ज्ञानाचा उपयोग हा विद्यार्थ्यांना व्हावा विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षेत यशस्वी व्हावे यासाठी आपण गेली १२ वर्ष विविध शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहोत व यापुढेही करीत राहु असे सांगितले.

# जनावरे शेतात सोडण्यावरून अणदूरमध्ये दोन गटांत राडा; परस्परविरोधी गुन्हे दाखल

नळदुर्ग : तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे जनावरे शेतात सोडण्याच्या कारणावरून दोन कुटुंबांमध्ये जोरदार वाद झाला. या वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले असून, दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या आहेत. पोलिसांनी दोन्ही तक्रारींची नोंद घेत परस्परविरोधी गुन्हे दाखल केल्याने गावात या घटनेची चर्चा रंगली आहे. पहिल्या तक्रारीनुसार, फिर्यादी निळकंठ लक्ष्मण घोडके, वय ४४ वर्षे, रा. अणदूर हे दि. ०८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास अणदूर येथील पडीक शेत गट क्रमांक १५७/३/२ येथे असताना प्रविण प्रकाश घोडके, भरत विलास घोडके, सतीश विलास घोडके, लता प्रकाश घोडके, श्रीदेवी सतीश घोडके व विलास बिरु घोडके, सर्व रा. अणदूर, यांनी जनावरे शेतात का सोडली या कारणावरून वाद घातल्याचा आरोप करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, संबंधितांनी गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली आणि लाथाबुक्क्यांनी तसेच दगडाने मारहाण करून निळकंठ घोडके यांना जखमी केले. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी निळकंठ घोडके यांनी ०८ सप्टेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), १८९(२), १९० व १९१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, याच घटनेप्रकरणी दुसऱ्या बाजूनेही पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. फिर्यादी भरत विलास घोडके, वय ३५ वर्षे, रा. अणदूर यांच्या तक्रारीनुसार, निळकंठ लक्ष्मण घोडके, ओंकार निळकंठ घोडके, समर्थ निळकंठ घोडके, शिवाजी लक्ष्मण घोडके, लक्ष्मण निलाप्पा घोडके, लक्ष्मी निळकंठ घोडके, सत्यभामा शिवाजी घोडके व रेखाबाई लक्ष्मण घोडके, सर्व रा. अणदूर, यांनी शेतातून जनावरे काढण्यास सांगितल्याच्या कारणावरून वाद घातल्याचे म्हटले आहे. भरत घोडके यांच्या तक्रारीनुसार, संबंधितांनी गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. त्यानंतर लाथाबुक्क्यांनी तसेच लोखंडी रॉड आणि कुऱ्हाडीने मारहाण करून जखमी केले आणि जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), १८९(२), १९१(२) व १९० अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. एकाच ठिकाणी आणि एकाच कारणावरून घडलेल्या या वादात दोन्ही बाजूंनी परस्परांवर गंभीर आरोप केले आहेत. एका बाजूने दगडाने मारहाण केल्याचा आरोप केला असताना दुसऱ्या बाजूने लोखंडी रॉड व कुऱ्हाडीने मारहाण केल्याचे पोलिसांत दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. त्यामुळे या घटनेचा नेमका क्रम, हाणामारीची कारणे आणि प्रत्यक्षात



कोणाकडून काय प्रकार घडला, याबाबत पोलीस तपासातून अधिक स्पष्टता येणार आहे. दरम्यान, या घटनेमुळे अणदूर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. दोन्ही गटांतील व्यक्तींनी पोलिसांत स्वतंत्र तक्रारी दाखल केल्याने पोलिसांसमोर या प्रकरणाच्या तपासाचे आव्हान निर्माण झाले आहे. दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने नळदुर्ग पोलीस पुढील तपास करीत असून, घटनेतील आरोपांची सत्यता तपासल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

सायंदैनिक राजस्व



# धाराशिव जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करून सरसकट आर्थिक मदत द्या; मुख्यमंत्री फडणवीसांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी तातडीची मंत्रिमंडळ बैठक बोलवावी - नगरसेवक मधुकर शेळके

तुळजापूर : ज्ञानेश्वर गवळी बैलपोळा म्हणजे शेतकरी आणि त्याच्या सर्जा-राजाच्या जिव्हाळ्याच्या नात्याचा सण. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांची पूजा करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस; मात्र यंदा बैलपोळ्याच्या उत्साहावरच निसर्गाच्या अवकृपेचे सावट पसरले आहे. धाराशिव जिल्ह्यात गेल्या जवळपास चाळीस दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिकांची अवस्था चिंताजनक झाली असून, विशेषतः शेतकऱ्यांच्या मोठ्या आशा असलेल्या सोयाबीन पिकाला पावसाच्या खंडाचा मोठा फटका बसला आहे. हाताशी आलेले पीक डोळ्यांसमोर संकटात सापडल्याने बळीराजाच्या वर्षभराच्या आर्थिक नियोजनालाच मोठा धक्का बसला आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन धाराशिव जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जिजामाता प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपचे नगरसेवक मधुकर शेळके यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींची केवळ कागदोपत्री माहिती न घेता मधुकर शेळके यांनी स्वतःच्या शेतासह जिल्ह्यातील विविध भागांतील शेतशिवारात प्रत्यक्ष जाऊन परिस्थितीची पाहणी केली. याशिवाय अनेक शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून पिकांची सद्यस्थिती आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पावसाअभावी अनेक ठिकाणी सोयाबीन पिकाची वाढ खुंटली असून, उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषध फवारणी, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केला आहे. अनेकांनी कर्ज अथवा उधारीच्या माध्यमातून हा खर्च भागविला आहे. आता उत्पन्नाची वेळ जवळ आली असतानाच पावसाने पाठ फिरवल्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे. त्यामुळे सध्याची परिस्थिती ही केवळ पिकांचे नुकसान नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेलाच हादरा देणारी असल्याचे शेळके यांनी म्हटले आहे. निसर्गाच्या या संकटामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात असताना शासनाने मदतीसाठी केवळ कागदोपत्री प्रक्रिया आणि पंचनाम्यांच्या प्रतीक्षेत शेतकऱ्यांना ठेवू नये, अशी मागणीही त्यांनी केली आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त भागाचा आढावा घ्यावा आणि शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदतीचा निर्णय घ्यावा, अशी त्यांची भूमिका आहे. पावसाचा खंड वाढत गेल्यास उर्वरित खरीप पिकांवरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने शासनाने विलंब न करता उपाययोजना करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी वर्षभराच्या उदरनिर्वाहासाठी ज्या पिकावर अपेक्षा ठेवली, त्याच पिकाचे नुकसान होत असल्याने त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक गरजांसह पुढील हंगामाचे नियोजनही अडचणीत आले आहे. त्यामुळे प्रशासनाने प्रत्यक्ष शेतशिवारातील परिस्थिती समजून घेऊन



तातडीच्या मदतीचा मार्ग मोकळा करावा, अशी अपेक्षा शेळके यांनी व्यक्त केली. धाराशिव जिल्ह्यासह राज्यातील पावसाच्या खंडामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांनी तातडीने मंत्रिमंडळाची बैठक बोलवावी, अशी मागणी मधुकर शेळके यांनी केली आहे. या बैठकीत जिल्ह्यातील खरीप पिकांच्या परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक मदत जाहीर करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झालेल्या भागात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने संवेदनशीलतेने आणि तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. प्रशासनाच्या अहवालांची प्रक्रिया सुरू असतानाच शेतकऱ्यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे निर्णय घेण्यास आणखी विलंब झाल्यास शेतकऱ्यांचे नुकसान वाढण्याची शक्यता असून, शासनाने परिस्थितीची गंभीर दखल घेऊन तातडीचा मदतीचा हात पुढे करावा, असे शेळके यांनी स्पष्ट केले. बैलपोळ्याच्या दिवशी शेतकरी आपल्या सर्जा-राजाची पूजा करून त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो; मात्र यंदा सर्जा-राजाची पूजा करतानाच बळीराजाच्या मनात स्वतःच्या संसाराची आणि शेतीच्या भवितव्याची चिंता आहे. वर्षभर कष्ट करूनही निसर्गाच्या लहरीपणामुळे हातातोंडाशी आलेले पीक वाया जाण्याची वेळ येत असेल, तर अशा परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणे आवश्यक आहे. शेतकऱ्याचे सोयाबीन पीक हातचे गेले आहे. आता त्याला आश्वासनांची नव्हे, तर तातडीच्या आर्थिक मदतीची गरज आहे. शासनाने वेळ न दवडता निर्णय घेऊन बळीराजाला दिलासा द्यावा, अशी ठाम भूमिका नगरसेवक मधुकर शेळके यांनी मांडली. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून सरसकट आर्थिक मदत मिळणार का, याकडे आता जिल्ह्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

# पशुवैद्यकीय सेवेसाठी ₹१,५०० शुल्क; पावती मात्र गायब?

तुळजापूर प्रतिनिधी

तुळजापूर तालुक्यातील आरळी खुर्द येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय सेवा देताना शेतकऱ्याकडून ₹१,५०० शुल्क आकारण्यात आले, मात्र त्याची अधिकृत पावती देण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासोबतच संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यातील शिपाई अनधिकृतपणे पशुवैद्यकीय प्रॅक्टिस करीत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकाराची चौकशी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष गणेश प्रभाकर पाटील यांनी केली आहे. याबाबत दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी तुळजापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तसेच तालुका पशुधन अधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात आरळी खुर्द परिसरातील शेतकरी व पशुपालकांच्या अडचणींचा गैरफायदा घेतला जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी पशुधन हे मोठे आर्थिक साधन असते. अशा परिस्थितीत जनावर आजारी पडल्यास शासकीय पशुवैद्यकीय सेवेकडून योग्य व नियमानुसार उपचार मिळणे अपेक्षित असताना शुल्क आकारणीबाबत पारदर्शकता नसल्यास शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण होणे स्वाभाविक आहे. निवेदनातील माहितीनुसार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी सुमारे २.५५ वाजता आराळी खुर्द येथील तक्रारदार धनाजी मनोहर पाटे यांनी त्यांच्या गाईच्या प्राथमिक उपचारासाठी संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. बिराजदार यांना बोलावले होते. उपचारादरम्यान गाईला एक इंजेक्शन व सलाईन लावण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या उपचारासाठी संबंधित शेतकऱ्याकडून ₹१,५०० शुल्क आकारण्यात आले, मात्र ही रक्कम नेमक्या कोणत्या शासकीय अथवा नियमानुसार शुल्कासाठी आकारण्यात आली, याचे स्पष्ट स्पष्टीकरण देण्यात आले नाही. तसेच या रकमेची अधिकृत पावतीही देण्यात आली नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, संबंधित व्यवहार फोन-पेच्या माध्यमातून झाल्याचा स्क्रीनशॉट/पुरावा उपलब्ध असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित रक्कम कोणत्या कारणासाठी स्वीकारण्यात आली, ती अधिकृत शुल्क होती का, असल्यास तिची पावती का देण्यात आली नाही, तसेच शासकीय नियमांनुसार पशुवैद्यकीय उपचारांचे शुल्क किती आहे, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपण कमी पैसे घेतले असून यापेक्षा अधिक दराने शुल्क आकारले जाते, असे सांगितल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे. दरम्यान, आराळी खुर्दसह परिसरातील इतर गावांमध्येही पशुवैद्यकीय सेवा देताना जादा शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी यापूर्वी शेतकऱ्यांकडून करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी आणि पशुपालकांच्या अडचणींचा गैरफायदा घेतला जात आहे का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर पशुवैद्यकीय दवाखान्यात कार्यरत असलेल्या शिपायाकडून अनधिकृतपणे पशुवैद्यकीय उपचार केले जात असल्याचा आरोप करण्यात आला असून, हा प्रकार नियमबाह्य असल्यास त्याच्यावरही कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. आकारण्यात आलेले ₹१,५०० हे अधिकृत शासकीय शुल्क होते की अन्य कारणासाठी स्वीकारलेली रक्कम होती, पावती का देण्यात आली नाही, तसेच अनधिकृत पशुवैद्यकीय प्रॅक्टिसचा आरोप तथ्यहीन आहे की त्यामागे काही तथ्य आहे, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. चौकशीत दोष आढळल्यास संबंधितांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी आणि तक्रारदार शेतकऱ्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# वाशीमध्ये अवैध गुटख्याचा साठा जप्त; ४६ हजार २१३ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात!

## विक्रीच्या उद्देशाने प्रतिबंधित गुटखा जवळ बाळगणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

वाशी प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची अवैध विक्री रोखण्यासाठी वाशी पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू ठेवला आहे. याच पार्श्वभूमीवर वाशी शहरातील पारा चौक परिसरात विक्रीच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा व तत्सम पदार्थ जवळ बाळगणाऱ्या दोघांवर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत तब्बल ४६ हजार २१३ रुपये किमतीचा प्रतिबंधित मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.१० वाजण्याच्या सुमारास वाशी शहरातील पारा चौक येथे पोलिसांचे पथक कारवाईसाठी गेले असता, अनिल वैजीनाथ करवलकर (वय ४३) आणि आदित्य दत्ता गायकवाड (वय २१), दोघेही रा. डिकसळ, ता. कळंब, जि. धाराशिव हे संशयास्पदरीत्या प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ जवळ बाळगल्याचे पोलिसांना आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडील साहित्याची तपासणी केली. तपासणीदरम्यान पोलिसांना गुटखा, विमल पान मसाला, डायरेक्टर स्पेशल पान मसाला, राजनिवास पान मसाला, सुगंधित तंबाखू आणि जाफरानी जर्दा यांसह विविध प्रतिबंधित पदार्थ आढळून आले. सदर मालाची एकूण किंमत ४६ हजार २१३ रुपये असल्याचे समोर आले. हा माल विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगल्याचा संशय असल्याने पोलिसांनी तत्काळ संपूर्ण गुटखा साहित्य जप्त करून दोन्ही संशयितांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली. प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री आणि साठवणूक करणाऱ्यांविरोधात वाशी पोलिसांकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. शासनाच्या आदेशानुसार प्रतिबंधित असलेले पदार्थ नागरिकांच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकतात. विशेषतः



तरुण पिढीमध्ये अशा पदार्थांचे सेवन वाढू नये, यासाठी त्यांची अवैध विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे. या कारवाईमुळे अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. या प्रकरणी वाशी पोलिसांनी संबंधित दोन्ही व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील कलम २६(२)(ii), २७(३)(व), २७(३)(श), ३०(२)(अ) आणि ५९ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, प्रतिबंधित पदार्थांचा हा साठा नेमका कोठून आणण्यात आला आणि त्याची विक्री कोणत्या ठिकाणी केली जाणार होती, याबाबतही तपासाच्या दृष्टीने माहिती घेतली जात आहे.

# श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयातील एच व्ही कुलकर्णी यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त !

तुळजापूर प्रतिनिधी




तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आस्थापना विभागात कार्यरत असणारे श्री एच व्ही कुलकर्णी यांना कोपरगाव येथील बी. द. चेंज फाउंडेशन या संस्थेकडून नॅशनल इंडियन आयडियल क्लर्क हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. दिनांक ६ सप्टेंबर२०२६ रोजी श्री साईबाबा मंदिर संस्थान, परिसर शिर्डी जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी मा.श्री सुनील उत्तमराव मोहोड, सुभेदार मेजर मा. श्री अरुण भंडारे, कार्याध्यक्ष त्रिदल सैनिक संघ नाशिक, सैनिक फेडरेशन नाशिक, मा. निवेदिता पगार अभिनेत्री व सर्व मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला हा पुरस्कार त्यांना प्रामाणिकपणा कर्तव्यनिष्ठा कार्यतत्परता आणि उत्कृष्ट प्रशासकीय सेवा याबद्दल प्राप्त झाला आहे .या गौरवपूर्ण पुरस्काराबद्दल श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैजनाथ घोडके, पर्यवेक्षक डॉ. सुभाष पेटकर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी श्री एच व्ही कुलकर्णी यांचे अभिनंदन केले.

सायंदैनिक
राजस्व



# अमरावती रुग्णालयातील ३ बालकांच्या मृत्यूप्रकरणी समितीचा अहवाल सादर

मुंबई : अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू विशेष काळजी कक्षात २४ ऑगस्ट २०२६ रोजी लागलेल्या आगीत तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी पूर्ण झाली आहे. चौकशी अहवाल शासनास सादर झाल्यानंतर अहवालाच्या आधारे दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाने दिले आहेत. या दुर्घटनेत ३६ बालकांना तातडीने अन्य रुग्णालयांमध्ये सुरक्षित हलविण्यात आले होते. याप्रकरणी, अधिकारी दोषी आढळून आले आहेत, त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून दोन कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात आले आहे. चौकशी समितीच्या अहवालानुसार व्हेंटिलेटरची वेळोवेळी आवश्यक देखभाल व दुरुस्ती न होणे, फायर अलार्म व स्प्रिंकलर यंत्रणा कार्यान्वित नसणे, फायर पंप हाऊस कुलूपबंद स्थितीत असणे तसेच उपकरणांच्या देखभाल व तांत्रिक तपासणीत गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. या प्रकरणी कामकाजातील हलगर्जीपणा, बेजबाबदार वर्तन, पर्यवेक्षीय नियंत्रणातील त्रुटी आणि अक्षम्य दुर्लक्ष यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ नुसार शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांवरही प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून सार्वजनिक बांधकाम विभागातील दुर्घटनेस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतही निर्देश देण्यात आले आहेत. पर्यवेक्षीय नियंत्रणातील त्रुटींसाठी प्रथमदर्शनी जबाबदार ठरविण्यात आलेले उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला परिमंडळ; रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक, स्त्री रुग्णालय अमरावती; अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, अमरावती; प्रशासकीय अधिकारी आणि वीजतंत्री, स्त्री रुग्णालय अमरावती यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.



# मुंढवा जमीन गैरव्यवहारप्रकरणी हायकोर्टाचा पोलीस महासंचालकांना सवाल

पुणे : झपाट्याने वाढत असलेल्या पुणे शहरातील जमीनचे भाव गगनाला भिडले आहे. त्याच, पुण्यातील बहुचर्चित आणि तब्बल १८०० कोटींच्या मुंढवा जमीन खरेदी प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल विधिमंडळात सादर केला होता. विकास खारगे समितीने तब्बल ४ हजार ३९२ पानांचा जंबो अहवाल सभागृहासमोर ठेवला. या अहवालात कुणालाही स्पष्टपणे क्लीन चीट देण्यात आलेली नसून, अनेक अधिकारी आणि संबंधितांवर कारवाईची शिफारस करण्यात आली आहे. मात्र, पार्थ पवार यांच्यावरील कारवाईबाबत थेट उल्लेख नसल्याने त्यांच्यावर कारवाईची टांगती तलवार कायम होती. आता, याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने पोलिसांना सवाल केला आहे. पार्थ पवारांना आरोपी का केलं नाही, अशी विचारणा तपास अधिकाऱ्यांना केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा खासदार पार्थ पवार यांच्यावरील आरोपानंतर मुंढवा जमीन गैरव्यवहारप्रकरणी समोर आलेल्या अहवालात थेट आरोपी म्हणून पार्थ पवार यांचे नाव नाही. त्यामुळे, एकप्रकारे पार्थ यांना दिलासा मिळाला होता. मात्र, आता पार्थ यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कारण, मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी पार्थ पवार यांच्यावर गुन्हा का दाखल करण्यात आला नाही, त्यांना का आरोपी केले नाही, असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र पोलिसांना केला. तसेच, पोलीस महासंचालकांसह तपास अधिकाऱ्यांनाही उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपिठाने हे आदेश दिले असून याप्रकरणी पुढील सुनावणी २८ सप्टेंबरला होणार आहे.



दरम्यान, खारगे समितीच्या अहवालात पार्थ पवार यांच्यावरील कारवाईबाबत थेट उल्लेख करण्यात आलेला नाही. मात्र, भविष्यातील फौजदारी तपासात अधिक लोकांचा सहभाग आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई होऊ शकते, असे समितीने नमूद केले आहे.

# गटई कामगारांच्या हाताला हक्काचा आधार ; सात लाभार्थ्यांना स्टॉलचे वाटप

धाराशिव,दि.९ सप्टेंबर (जिमाका) रस्त्याच्या कडेला किंवा मोकळ्या जागेत बसून ऊन,वारा आणि पावसाची तमा न बाळगता आपला छोटासा व्यवसाय करणाऱ्या गटई कामगारांना आता हक्काच्या स्टॉलचा आधार मिळाला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सात गटई कामगारांना मंगळवारी ८ सप्टेंबर रोजी पत्र्याच्या स्टॉलचे वाटप करण्यात आले.या स्टॉलमुळे प्रतिकूल हवामानापासून संरक्षण मिळण्याबरोबरच या कष्टकरी कामगारांना आपला व्यवसाय अधिक सुरक्षित आणि सन्मानाने करता येणार आहे.

दि.१३ फेब्रुवारी २००८ च्या शासन निर्णयानुसार गटई कामगारांना ऊन,वारा व पावसापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी, या उद्देशाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ही योजना राबविण्यात येते. ग्रामपंचायत आणि नगरपालिका क्षेत्रातील गटई कामगारांना या योजनेतून १०० टक्के शासकीय अनुदानावर पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करून दिले जातात.याशिवाय लाभार्थ्यांना व्यवसायासाठी आवश्यक साहित्य खरेदी करता यावे,यासाठी प्रत्येकी ५ हजार रुपयांचे अनुदान थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने देण्यात येते. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात प्राप्त तरतुदीतून जिल्ह्यातील सात लाभार्थ्यांची या योजनेसाठी निवड करण्यात आली.सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,धाराशिव यांच्या कार्यालय परिसरात दि.८ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषद समाज कल्याण समिती सभापती विश्वास कोकणे आणि समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांच्या हस्ते लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वाटप करण्यात आले.यावेळी समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने तसेच समाज कल्याण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



स्टॉल योजनेअंतर्गत मंगेश नामदेव साबळे (रा.पळसप,ता.जि. धाराशिव),वैभव दत्तात्रय बनसोडे (रा.तेर,ता.जि.धाराशिव),बालाजी सदाशिव शेरखाने (रा.रुईभर, ता.जि.धाराशिव),ज्ञानेश्वर गोपाळ माने (रा.पोहनेर,ता. जि.धाराशिव), बब्रुवान व्यंकट हाकारे (रा.सांजा,ता. जि.धाराशिव), पांडुरंग जीवन शेरखाने (रा.चिलवडी,ता. जि.धाराशिव) आणि दत्तात्रय नानासाहेब राजगुरू (रा.बावी,ता.जि.धाराशिव) या सात लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वाटप करण्यात आले.

# १९९३ मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात मुदतपूर्व सुटकेची मागणी सुप्रीम कोर्टाने फेटाळली

१९९३ च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट आणि बांधकाम व्यावसायिक प्रदीप जैन यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या गँगस्टर अबू सालेम संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. १९९३ बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी आणि गैंगस्टर अबू सालेमला सुप्रीम कोर्टानं मोठा झटका दिलाय. १९९३ मुंबई बॉम्बस्फोटातील दोषी अबू सालेमची २५ वर्षांचा कारावास पूर्ण झाल्याच्या आधारावर सुटकेची मागणी करणारी याचिका कोर्टाने फेटाळली आहे.

२५ वर्षे पूर्ण कारावास झाल्याचा दावा फेटाळला, अबू सालेमच्या सुटकेच्या मागणीला नकार

दरम्यान, २००५ मध्ये पोर्तुगालमधून भारतात आणताना २५ वर्षांपेक्षा अधिक कारावास न देण्याचे भारत सरकारने आश्वासन दिले होते. अंडरट्रायल काळ, दोषसिद्धीनंतरचा कारावास आणि चांगल्या वर्तणुकीची रिमिशन मोजल्यास ३१ मार्च २०२५ रोजी २५ वर्षे पूर्ण झाल्याचा सालेमचा दावा होता. तर २०२२ मध्ये सुप्रीम कोर्टाने २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर केंद्राने लवकर सुटकेची प्रक्रिया सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, पोर्तुगालमधील पासपोर्ट फसवणूक प्रकरणातील कारावासाचा कालावधी २५ वर्षांत मोजता येणार नसल्याचे कोर्टाने स्पष्ट केले होते. परिणामी बॉम्बे हायकोर्टानंतर सुप्रीम कोर्टानेही आज सालेमच्या सुटकेच्या मागणीला नकार दिला असून सुटका करण्याची गँगस्टर अबू सालेमची मागणी कोर्टाने फेटाळून लावत मोठा झटका दिला आहे.



# श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयात रक्षाबंधन उत्साहात साजरा

तुळजापूर प्रतिनिधी

तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. वैजनाथ घोडके सर यांच्या मार्गदर्शनानुसार सांस्कृतिक विभागातर्फे बहिण भावाच्या पवित्र नात्यांचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमांमध्ये पुरुष पालक व महिला पालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. महिला भगिनींनी विद्यालयातील सर्व मुलांना राख्या बांधल्या व खाऊ वाटप करण्यात आला.तसेच



विद्यार्थ्यासमवेत विद्यालयातील हिरव्या गर्द अशा सुंदर झाडांना राख्या बांधण्यात आल्या. कर्मचारी प्रतिनिधी म्हणून सर्वांचे लाडके मगर मामा यांना राखी बांधण्यात आली. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री मगर मामा,श्री स्वामी सर, श्री सलगर सर,व सर्व महिला कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


# शालेय पोषण आहारात मुदत संपलेले मसाले, स्वच्छतागृहाच्या शेजारी धान्याचा साठा

सिंधुदुर्गच्या कुडाळमधून एक अत्यंत धक्कादायक आणि चीड आणणारी बातमी समोर येत आहे. एका नामांकित विद्यालयात चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या जीवाशी थेट खेळ खेळला जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शालेय पोषण आहारात मुदत संपलेले मसाले वापरले जात असून, धान्याचा साठा थेट स्वच्छतागृहाच्या शेजारी अत्यंत किळसवाण्या स्थितीत ठेवल्याचे समोर आले आहे. या गंभीर प्रकारानंतर शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांनी शाळेत धडक देऊन प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.

दरम्यान, कुडाळमधील या नामांकित शाळेत तब्बल ४०० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेतात, ज्यातील सुमारे १४० मुले दररोज शाळेत शिजणारा पोषण आहार खातात. मात्र, या चिमुकल्यांच्या आरोग्याची आणि जिवाची प्रशासनाला अजिबात पर्वा नसल्याचे विदारक चित्र पाहायला मिळाले.

पोषण आहारासाठी पूर्णपणे झालेले 'एक्सपायर' मसाले; शिंदे सेनेचे कार्यकर्ते आक्रमक

दरम्यान, पोषण आहारासाठी वापरण्यात येणारे मसाले पूर्णपणे 'एक्सपायर' झाले होते. एवढेच नाही तर, लहान मुले जो तांदूळ खातात, तो तांदूळ थेट स्वच्छतागृहाच्या शेजारी अस्वच्छ वातावरणात साठवून ठेवण्यात आला होता. शिक्षकांच्या भोंगळ कारभाराचा कळस म्हणजे, हे शिक्षक विद्यार्थ्यांची रोज हजेरी घेतात, मात्र स्वतः मस्टरवर सही करायलाच विसरतात! या सर्व बेजबाबदार प्रकाराची माहिती मिळताच शिंदे सेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते आक्रमक झाले. दरम्यान या प्रकरणाची गंभीर दाखल घेऊन दोषींवर कारवाईची मागणी आता करण्यात येत आहे.



५४ वर्षीय शिक्षकाकडून चिमुकल्या विद्यार्थिनींसोबत संतापजनक कृत्य; ग्रामीण पोलिसात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

वाशिमच्या एका गावाच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत असाच एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. यात ५४ वर्षीय शिक्षकाने जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या अनेक चिमुकल्या विद्यार्थिनींच विनयभंग केल्याची घटना समोर आलीय. यात ५४ वर्षीय शिक्षक दिलीप बोरकर यांनी तिसऱ्या आणि चौथ्या वर्गात शिकणाऱ्या चिमुरडया मुलींना जवळ घेत अश्लील चाळे करत विनयभंग केल्याचं एका विद्यार्थिनी तिच्या पालकांना सांगितलं.